||संस्कृती रक्षति: स्त्री शक्ति:||

भगिनी मंडळ चोपडा संचलित

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव

भगिनी मंडळ,
चोपडा, जि. जळगांव

**स्थापना वर्ष-१९९४**

*विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास योजना*
*अंतर्गत कार्यशाळा*

# युवती सभा कार्यक्रम अहवाल व हिशोब पत्रक

**दिनांक-२९ जानेवारी, २०१९**


**प्रा.संबोधी एम.देशपांडे,** (युवती सभा प्रमुख)

Sundargadhi ,Chunchale Road ,
Tal-Chopda, Dist-Jalgaon

**Phone No.02586 - 223017**

Website:- www.bmcswchopda.org
e-mail:- bmcsw.chopda@gmail.com


BMC's College of Social Work, Chopda IQAC

महाराष्ट्र शासन अनुदानित व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संलग्नीत
भगिनी मंडळ चोपडा संचलित,
# समाजकार्य महाविद्यालय चोपडा जि.जळगांव
महाराष्ट्र शासन मान्यता पत्र क्र.
CSW.1094/12355/F.N.107/Sudhar,1 Dt.30/6/1994
विद्यापीठ मान्यता पत्र क्र.
NMU/94/5/J-48/6152 Date:-13/9/1994
Dr.Ishwar M. Saundankar
Principal
Phone No.02586-223017
Fax No. 02586-223017, 220533
भगिनी मंडळ, चोपडा, जि. जळगांव
'B' Grade NAAC Accredited (2.66)
Mrs.Poonam Ashish Gujarathi
President
Post Box No.20, Chopda
Phone No.02586-220015

जा.क्रं.- भमसकाम/444/2018-19 दिनांक 29/3/2019

प्रति,
मा.संचालक सो.
विद्यार्थी विकास विभाग
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

**विषयः-युवती सभेचा-२०१८-१९ अहवाल व हिशेब पत्रक स्विकारणेबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंती की, भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव येथे युवती सभा अंतर्गत विद्यार्थीनींची कार्यशाळा दि.२९ जानेवारी, २०१९ या दिवशी संपन्न झाली. सदर युवती सभेचा अहवाल कार्यक्रमाचे फोटोसह पाठवित आहोत. तसेच कार्यक्रमाचे खर्चाचे हिशोब पत्र पाठवित आहोत.

कृपया स्विकार व्हावा ही विनंती.

स्नेहादराने,

आपला विश्वासू,

(डॉ.ईश्वर मा.सौंदाणकर)
प्राचार्य,
भगिनी मंडळ चोपडा संचलित,
समाजकार्य महाविद्यालय चोपडा,
जि.जळगांव

सोबतः- १) अहवाल
२) खर्चाचे व्हावचर्स

# युवती सभा अंतर्गत विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास योजने अंतर्गत कार्यशाळेचा अहवाल

BMC's College of Social Work, Chopda IQAC

**दि. २९ जानेवारी २०१९**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा जि.जळगांव येथे युवती सभा अंतर्गत विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा दिनांक 29/01/2019 रोजी मंगळवार रोजी आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेमधुन महाविद्यालयातील युवतीना विविध विषयावरील ज्ञान मिळावे आणि या ज्ञानाचा उपयोग त्यांनी प्रत्यक्ष जीवनात काम स्वतःचा सर्वागिण विकास करावा हा या कार्यशाळेचा हेतू होता. या कार्यशाळेमध्ये महात्मा गांधी संचलित कला शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय व पंकज महाविद्यालय, स्कूल ऑफ नर्सिग चोपडा आणि समाजकार्य महाविद्यालय एकूण 91 विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या.

युवती सभा अंतर्गत व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे उदघाटन भगिनी मंडळ संस्थेच्या अध्यक्षा मा.सौ.पुनमताई गुजराथी, मा.सौ.छायाबेन गुजराथी (उपाध्यक्षा भगिनी मंडळ) मा.सौ.अश्विनीताई गुजराथी (सहसचिव भगिनी मंडळ चोपडा) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर कार्यशाळेचे उदघाटक मा.सौ.वैशाली महाजन (डेप्युटी मॅनेजर जळगाव जनता सहकारी बँक जळगांव) प्रा.आशिष गुजराथी, मा.प्रा. विनोद रायपूरे (अभ्यास मंडळ अध्यक्ष) यांच्या हस्ते करण्यात आले प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

याप्रसंगी त्यानी या कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. युवतींनी आपल्या जीवनामध्ये अधिक सक्षम होण्यासाठी व विविध विषयावरील ज्ञान घेण्याकरिता सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये उद्योजकता,विकास,स्त्री जन्माचे स्वागत,युवतीचे आरोग्य,युवतीचा व्यक्तिमत्व विकास आणि बेटी बचाव बेटी पढाव या सर्व विषयावर युवतीनी चर्चा करुन या चर्चेचा उपयोग आपल्या प्रत्यक्ष जीवनामध्ये करावा अशी अपेक्षा त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

यानंतर सर्व आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. आजच्या कार्यशाळेच्या उदघाटक मा.सौ.वैशाली महाजन (डेप्युटी मॅनेजर, जळगांव जनता सहकारी बँक,जळगांव)

यांनी आपल्या **उद्योजकता विकास** या विषयावरील व्याख्यानात विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. त्या स्वतः आपल्या जीवनात यशस्वी उद्योजिका आहेत. त्यानी आपले स्व-अनुभव विद्यार्थीनीना सांगितले. छोटया उद्योगातूनच एक यशस्वी उद्योजिका घडू शकते असे मत त्यानी व्यक्त केले. युवतींना पुढील वाटचालीसाठी त्यानी शुभेच्छा दिल्या.

यानंतर कार्यशाळेच्या उदघाटन कार्यक्रमातील अध्यक्षीय भाषणामध्ये भगिनी मंडळ संस्थेच्या अध्यक्षा मा.सौ.पुनमताई गुजराथी यांनी सदर कार्यशाळा ही विद्यार्थीनीचा व्यक्तिमत्व विकासाला वाव देणारी आहे. या निमित्ताने विचारांची देवाण घेवाण करण्यासाठी खुले व्यासपीठ विद्यार्थीनीना उपलब्ध करुन दिले आहे. या कार्यशाळेमधील व्याख्यानाचा उपयोग युवतीना युवतीमधील आत्मविश्वास वृधिगंत करण्यासाठी निश्चितच उपयोगी ठरेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली उदघाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.शैलेष पाटील (सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी) यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.संबोधी देशपांडे (विद्यार्थी विकास अधिकारी) यांनी केले.

यानंतर मा.श्री.डी.व्ही.याज्ञिक (मुख्याध्यापक, प्रताप विद्या मंदीर चोपडा ) यांनी युवतीना **स्त्री जन्माचे स्वागत** या विषयावर मार्गदर्शन केले. स्त्री जन्माचे स्वागर करत असताना भारतीय संस्कृती मधील स्त्रियाचे प्राचीन काळापासून योगदान कसे राहीले आहे, या विषयी माहिती त्यानी युवतीना करुन दिली. तसेच आजच्या काळातील अनेक प्रतिभाशाली स्त्रियांविषयी माहिती त्यांनी युवतीना करुन दिली आपला स्वतःचा विकास आपणच करु शकतो. स्त्रियांना समान वागणूक देऊन त्यांचा आत्मसन्मान करुनच आपल्या देशाची प्रगती होईल असे मत याप्रयंगी व्यक्त केले.

यानंतर सर्व विद्यार्थीनीना भोजन देण्यात आले. दुपारच्या सत्रामध्ये मा.डॉ.कविता पाटील (ओम, हॉस्पिटल चोपडा) यांनी युवतीचे आरोग्य या विषयावर युवतीशी चर्चा केली. त्यामध्ये युवतीची दिनचर्या स्पष्ट केली. युवतीच्या शारीरीक व मानसिक परिस्थतीबाबत त्याच्याशी चर्चा केली. त्यांना येणा-या समस्या होणारा त्रास याविषयी त्यांनी सखोल माहिती युवतीना करुन दिली. आपल्या आरोग्याची काळजी आपणच घेतली पाहीजे याविषयी त्यांनी विद्याथीनीना मार्गदर्शन केले.

यानंतर मा.प्रा.डॉ. विजयालक्ष्मी रायपूरे (सहा. प्राध्यापिका तंत्र निकेतन महाविद्यालय

चोपडा) यांनी **युवतींचा व्यक्तिमत्व विकास** या विषयावरील विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले त्यामध्ये आपले अंतर्गत व्यक्तिमत्व आणि बाह्य व्यक्तिमत्व या विषयी माहिती त्यांनी विद्यार्थीनींना दिली. आपले बोलणे, राहणीमान, आपलं दिसणे, आपल्या अंगी असणारे कौशल्य या सर्व बाबी या व्यक्तिमत्वाशी कश्या निगडित आहेत याची चर्चा त्यानी सोप्या व सहज उदाहरणातून विद्यार्थीनीशी केली. आपले व्यक्तिमत्व जर आपण सकारात्मक दिशेने घडविले तर आयुष्यात येणा-या सर्व संकटांना सहजपणे सामोरे जावू शकू पण नकारात्मक रितीने घेतल्यास त्याचा उलट परिणाम आपल्या करियर व व्यक्तिमत्वावर होऊ शकतो अशी मांडणी त्यानी आपल्या व्याख्यानातून केली. अतिशय उत्तम रीतीने आपले काम करताना दिसत आहेत. तसेच जर मुलगी शिकली तर ती आपल्या कुटूंबाला, घराला सुशिक्षित करते त्यामुळे मुलीना उच्च शिक्षण दिले पाहिजे अशी मांडणी त्यानी आपल्या व्याख्यानामध्ये केली. पंचायत समितीमध्ये मुलीचे शिक्षण, आरोग्य याकरिता असलेल्या योजनांची माहितीही त्यानी या प्रसंगी विद्यार्थीनीना करुन दिली आणि पुढील भावी आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

यानंतर कार्यशाळेचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, मा.श्री.आर.पी.पाटील प्रा.शैलेश पाटील, प्रा.डॉ. संबोधी देशपांडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

स्कूल ऑफ नर्सिग, चोपडा, आणि पंकज महाविद्यालयातील विद्यार्थीनीनी दिवसभरच्या या कार्यशाळेमधील आपले मनोगत व्यक्त केले. मनोगत व्यक्त केल्यानंतर प्रातिनिधिक व्यरुपात या विद्यार्थीनीना कार्यशाळेचे प्रमाणपत्र देण्यात आले.,

यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर यांनी विद्यार्थीनीना या व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत मिळालेल्या मार्गदर्शनाचा उपयोग आपल्या पुढील भावी काळात योग्य पध्दतीने करुन स्वतःचा सर्वांगिण विकास करावा यातूनच या कार्यशाळेचा हेतू साध्य होईल असे आवाहन त्यांनी समारोपीय व्याख्यानामध्ये केली.

समारोपीय कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा.शैलेश पाटील (सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी) यांनी केले आणि आभार प्रदर्शन प्रा.डॉ.संबोधी देशपांडे (विद्यार्थी विकास अधिकारी) यांनी केले.

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda